# म्युच्युअल फंडातून मुलांची स्वप्नपूर्ती

**अरविंद परांजपे**

(अर्थविषयावरचे लेखक)

' आमच्या चिंगीला सरी करायच्या, साखळ्या करायच्या, बिंदल्या करायच्या.. सर्व दागिने करायचे. कसा छानदार परकर नेसायचा, मग ठुमकर शाळेत जायचे.. ती मोठी मोठी बुकं वाचेल! अन मग महाराज, छोनीचं आमच्या लगीन! अस्सं थाटानं लग्न करीन की ज्याचं नाव ते! आहात कुठे? वरात पण वरात निघेल म्हणावे! नळे, चंद्रज्योती, झाडे यांचा काय लकलकाट होईल........'!!

मराठीतले सुप्रसिद्ध नाट्यछटाकार दिवाकर यांची 'चिंगी महिन्याची झाली नाही तोच' या नावाची ही नाट्यछटा सुपरिचित आहे. सुमारे शंभर वर्षांपूर्वी लिहिलेल्या या नाट्यछटेत मुलगी घरात जन्माला आली की पुढे तिच्याकरता पालक कशी स्वप्ने रंगवत असत याचे मनोरंजक वर्णन लिहिले आहे. यातला विनोदाचा भाग बाजूला ठेऊन हे नक्की म्हणता येते की यातल्या चिंगीची आई ही ही सर्वच पालकांची प्रतिनिधी आहे आणि आपल्या पाल्याला उत्तम शिक्षण देऊन तिचे थाटात लग्न करावे असे सर्व पालकांप्रमाणे तिलाही वाटते आहे. यात त्याकरता किती पैसे लागतील याचा उल्लेख नाही पण जरी तेंव्हा स्वस्ताई असली तरीही असे सगळे लाड करायचे असतील तर तिच्या पालकांना त्याकरता पैशांची सोय करायला लागणारच होती. पण आत्ताच्या काळातील 'आन्या' किंवा 'रिहान' यांच्या पालकांना या जुन्या जमान्यातल्या चिंगीच्या पालकांपेक्षा कितीतरी पट जास्त आर्थिक तरतूद करावी लागते आहे. कारण आजच्या काळातले पालक याहीपेक्षा अधिक मोठी स्वप्ने बघत असतात आणि महागाईने सर्वच खर्च वाढले आहेत. आताच्या काळात एक किंवा दोनच मुले असतात आणि त्यांना उत्तमोत्तम शिक्षण, सर्व सुखसोयी मिळाव्यात म्हणून पालकही धडपड करत असतात.

पण ही उद्दिष्टपूर्ती होण्याकरता पालकांनी योग्य नियोजन करणे आवश्यक असते. असे नियोजन करताना आपल्या मुलांकरता किती रक्कम किती वर्षांनी आणि कशाकरता लागणार आहे याचा अंदाज घेतला पाहिजे. तसेच त्याचा प्राधान्यक्रमही ठरवला पाहिजे. हे ठरवले म्हणजे त्याकरता किती जोखीम घ्यायची आहे हे ठरवता येते.

सध्या पूर्वप्राथमिक शिक्षण म्हणजे प्लेग्रुपला २ वर्षांपासूनच मुलांना घातले जाते आणि त्यांची वार्षिक फी तर काही हजार रुपयेही असते. गंमत म्हणजे या मुलांच्या पालकांचे पदवी घेईपर्यंतचे पूर्ण शिक्षण जेवढ्या पैशात झाले तेवढे पैसे आजच्या मुलांच्या फक्त प्राथमिक शिक्षणालाच लागतात! म्हणजे मुलांच्या करता आवश्यक आर्थिक तरतूद त्यांच्या अगदी लहान वयातच सुरवात होते आणि ती त्यांच्या स्वत:च्या पायांवर उभी राहीपर्यंत पालकांना करावी लागते. खरं म्हणजे मूल जन्माला यायची चाहूल लागली की लगेचच खर्चाला सुरवात होते. मुलांमधे पालकांची भावनिक गुंतवणूक मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे मुलांच्या हितासाठी, त्यांच्या शिक्षणासाठी, स्वत:कडे दुर्लक्ष करून, प्रसंगी पोटाला चिमटा काढूनही पालक त्यांच्याकरता स्वत:च्या निवृत्तीला लागणाऱ्या रकमेतूनही खर्च केला जातो. पण जर योग्य नियोजन केले तर असे करण्याची गरज रहाणार नाही.

## आर्थिक गरज किती?

मुलांकरता किती पैसे, कशाकरता आणि किती वर्षे खर्च करावे हे मुलांच्या इच्छेनुसार आणि पालकांच्या आर्थिक परिस्थितीनुसार ठरते. त्याकरता नक्की किती रक्कम लागेल हे सांगणे कठिण आहे पण साधारणपणे या तक्त्यात दिल्याप्रमाणे टप्प्यानुसार एका मुला/मुली करता खर्च किती येऊ शकेल याचा अंदाज दिला आहे. अर्थातच प्रत्येकाच्या परिस्थितीनुसार आणि आकांक्षांनुसार यात फरक पडू शकतो. आणि घरामधे जेवढी मुले असतील त्याप्रमाणे त्या खर्चात वाढ होईल.

## मुलांकरता अंदाजे आर्थिक तरतूद

| कशाकरता रक्कम लागेल? | कधी लागेल? (पाल्याचे वय) | अंदाजे खर्च (रु. लाख) |
|---|---|---|
| १) जन्मापूर्वीचा खर्च | -६ महिने ते २ वर्षे | १ ते २ लाख (%) |
| २) पूर्व प्राथमिक शिक्षण (प्लेग्रुप ते सिनिअर केजी) | वय वर्षे २ ते ५ | १ ते ४ लाख |
| ३) प्राथमिक (पहिली ते चौथी) | वय वर्षे ६ ते १० | ४ ते ८ लाख |
| ४)माध्यमिक शिक्षण (५ वी ते १०वी) | वय वर्षे ११ ते १४ | ६ लाख ते १४ लाख |
| ५) उच्च माध्यमिक शिक्षण(११वी, १२वी) | वय वर्षे १५ ते १६ | ४ ते ६ लाख |
| ६) पदवीपूर्व | वय वर्षे १७ ते २० | ३ लाख ते ६ लाख |
| ७)पदव्युत्तर शिक्षण - | वय वर्षे २१ ते २५ | ६ लाख ते २४ लाख |
| ८) पदव्युत्तर शिक्षण- | वय वर्षे २१ ते २५ | २० लाख ते ५० लाख✻ |
| ९)लग्नाकरता | २६वर्षे ते ३० वर्षे | ५ ते २५ लाख |
| १०)घर घेण्याकरता | पहिला हप्ता | १० लाख ते ३० लाख |
| | **एकूण** | **५० लाख ते १ कोटी ६० लाख** |

**(%)** - मुलाच्या जन्मापूर्वी/नंतर जर आईला बिन पगारी / अर्धवेळ नोकरी करावी लागली तर त्यामुळे बुडणाऱ्या उत्पन्नाची रक्कमेचा यात समावेश नाही.

✻(विशेष कॉलेजमधील एमबीए/इंजिनिअरिंग/मेडिकल अथवा परदेशातील शिक्षण संस्थेत १ कोटी रुपये किंवा जास्तही खर्च असू शकतो.)

- सध्या अगदी बालवाडीपासूनच शाळांचे प्रवेश शुल्क/देणग्या/अनामत रक्कम आणि शिक्षण शुल्क, कोचिंग क्लासेस, आणि अन्य बाबी म्हणजे गणवेश, संमेलने, यात भरमसाठ वाढ झाली आहे. मुलांसाठी पाळणाघर, बस/व्हॅन, क्लासची फी, सायकल/ स्कूटर/बाईक, मोबाईल फोन/टॅब/लॅपटॉप, वसतीगृह, असेही खर्च असतात ज्यांची तरतूद करावी लागते. त्याशिवाय मुख्य शिक्षणाबरोबर, कलाशिक्षण, नेहमीचे खेळ, साहसी खेळ, छंद, देशातील आणि परदेशातील सहली, विशेष शिबिरे, प्रशिक्षण वर्ग अशा अभ्यासेतर बाबींवरचाही खर्च खूप वाढलेला आहे. शिक्षणाच्या खर्चाचा अंदाज करताना त्यात या इतर खर्चांचाही समावेश केला पाहिजे. अर्थातच यामधे प्रत्येक पाल्य आणि पालक यांच्या गरजेनुसार आणि अपेक्षेनुसार फरक पडेल. सर्व शिक्षण (प्राथमिक ते पदव्युत्तर) कुठल्या शिक्षण

संस्थेमधून व कुठे (शहरात/मोठ्या शहरात/परदेशात) घेतले जाते त्यानुसार शिक्षणाला लागणारा खर्च बदलू शकतो. शिक्षणाच्या खर्चाशिवाय मुलांच्या लग्नाच्या खर्चाची आणि नंतर त्याला घर घेता यावे याचीही तरतूद पालक करतात. त्यासाठीही पहिल्यापासून नियोजन असणे आवश्यक असते. शिक्षण खर्चातल्या महागाईवाढीचा दर नेहमीच्या महागाईवाढीच्या दरापेक्षा जास्त असतो. याची अधिकृत आकडेवारी जरी उपलब्ध नसली तरी तो वार्षिक १०% एवढा गृहित धरून पुढील काळात किती रक्कम लागणार आहे याचे नियोजन केले पाहिजे. म्हणजे '७२ च्या नियमानुसार ही रक्कम ७ वर्षांनी दुप्पट लागेल असे गृहित धरून या खर्चाचे नियोजन केले पाहिजे. म्हणजेच आजच्या किंमतीला अपेक्षित असणारे खर्चाचे हे आकडे ती रक्कम किती वर्षांनी लागणार याप्रमाणे वाढ धरून घेतले पाहिजेत. उदाहरणार्थ जर एमबीए करता आज २० लाख रुपये एवढा खर्च अपेक्षित असेल तर वार्षिक १०% महागाई दराने १४ वर्षांनी तो साधारण ८० लाख रुपये होईल असे समजून तरतूद करावी.

**गुंतवणूकीचे धोरण काय असावे ?**

सर्वात महत्त्वाचे म्हणजे ही तरतूद करण्याकरता पालक करत असणाऱ्या गुंतवणुकीवरचा अपेक्षित परतावा हा महागाईच्या वाढीपेक्षा जास्त असणे जरुरीचे आहे. त्याकरता इक्विटी किंवा हायब्रीड इक्विटी योजनांमधील गुंतवणूक योग्य ठरेल. पीपीएफ, मुदत ठेवी, पोस्ट योजना किंवा पारंपारिक आयुर्विमा हे पर्याय जरी सुरक्षित असले तरी शिक्षण खर्चातील वाढीपेक्षा जास्त परतावा देऊ शकत नाहीत. त्यामुळे जोखीम घेऊन न म्युच्युअल फंडातील इक्विटी प्रकारात गुंतवणूक केली पाहिजे. यातही फक्त लार्ज कॅप योजनेची निवड न करता मल्टीकॅप +मिड कॅप + स्मॉल कॅप योजना आणि ॲग्रेसिव्ह हायब्रीड योजना (किमान ६५% इक्विटी) यांचा समावेश असलेला पोर्टफोलिओ केला तर उद्दिष्टपूर्ती व्हायला मदत होईल.

जितक्या अधिक काळाकरता गुंतवणूक केली जाते तेवढी इक्विटी योजनांची जोखीम कमी होत जाते हे गेल्या ३० वर्षातील आकडेवारीवरून समजून येते. मुलांकरत्ता गुंतवणूक करताना ती नेहमीच जास्त कालावधीची असल्याने इक्विटी योजनांमध्ये करणे फायद्याचे असते. परंतु प्रत्यक्षात असे दिसते की उलट दिशेने विचार केला जातो आणि जोखीम न घेता सुरक्षित पर्यायाची निवड केली जाते. यामुळे कमी परतावा मिळतो आणि जास्त काळाकरता/किंवा/आणि जास्त रकमेची गुंतवणूक करावी लागते. पीपीएफ वरचा परतावा आणि इक्विटी योजना यातील परताव्यामुळे किती फरक पडला हे पुढील तक्त्यात दाखवले आहे. (या तक्त्यातील योजना या केवळ उदाहरणासाठी निवडलेल्या आहेत. या नमुन्यावरून इक्विटी योजना किंवा ॲग्रेसिव्ह हायब्रीड योजनांनी गेल्या पंधरा वर्षात कशाप्रकारे परतावा दिला आहे याची आपल्याला कल्पना येऊ शकेल.)

| **योजनेचा प्रकार** | **योजनेचे नाव** | **वार्षिक चक्रवाढ परतावा (सीएजीआर)** | | | **१५ वर्षा नंतर** | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **मुदत** | | | **स्टेपअप नाही** | **दरवर्षी ५% स्टेपअप** |
| | | **५ वर्षे** | **१० वर्षे** | **१५ वर्षे** | | |
| इक्विटी लार्ज कॅप | एसबीआय ब्लु चिप | ११.६% | १२.७% | १२.७% | ५३.४ लाख | ६५.३ लाख |
| इक्विटी फ्लेक्सी कॅप | एचडीएफसी फ्लेक्सी | १४.४% | १३.0% | १३.२% | ५६.४ लाख | ६८.२ लाख |
| इक्विटी मिड कॅप | निप्पॉन ग्रोथ फंड | १७.५% | १५.८% | १४.५% | ६३.६ लाख | ७६.३ लाख |
| इक्विटी स्मॉल कॅप | कोटक स्मॉल कॅप | २४.६% | २०.३% | १८.१% | ९१.५ लाख | १०५.३ लाख |
| ॲग्रेसीव्ह हायब्रीड इक्विटी | आयसीआयसीआय इक्विटी आणि डेट | १७.३% | १५.४% | १४.८% | ६५.५ लाख | ७८.३ लाख |
| मुलांसाठी योजना | एचडीएफसी चिल्ड्रेन गिफ्ट | १४.४% | १३.४% | १४.२% | ६१.७ लाख | ७४.३ लाख |
| सुरक्षित ठेव प्रकार | पीपीएफ | ७.८% | ८.२% | ८.४% | ३५.६ लाख | ४६.२ लाख |

५% स्टेप अप म्हणजे एस आय पी च्या रकमेत दर वर्षी ५% नी वाढ करणे. उदा: पहिल्या वर्षी रू.१0,000, २ ऱ्या वर्षी १0,५00 तिसऱ्या वर्षी ११,0२५, ४थ्या वर्षी ११,५७६ रुपये अशी रक्कम वाढत जाऊन १५व्या वर्षी १९,८00 रुपये रक्कम होईल.

(सूचना: म्युच्युअल फंडाची कामगिरी शेअरबाजारावर अवलंबून असते. मागील कामगिरी परत होईल याची खात्री नसते.)

म्युच्युअल फंडांमधील गुंतवणूक लाभदायी ठरते हे आता सर्वसाधारणपणे माहिती झाली आहे .त्यांच्या पारदर्शी कामकाज पद्धतीने ते आता गुंतवणुकीचे उत्तम साधन म्हणून पुढे आले आहेत. एस आय पी चा प्रचारही आता झाला आहे. त्यामुळे सध्या १२,000 कोटी रुपये दर महिना एस आय पीच्या माध्यमातून दर महिना शेअरबाजारात गुंतवणूक होते आहे. त्यामुळे लवकरात लवकर म्हणजे मुलांकरता आर्थिक तरतूद करण्यासाठी लग्न झाल्यावर लगेचच इक्विटी योजनेत एसआय पी करायला सुरवात करावी.

## एक कोटी रुपयाचे लक्ष कसे गाठावे ?

वरील तक्त्यात जो अंदाज दाखवला आहे त्यानुसार जर १ कोटी रुपये निधी उभारण्याचे लक्ष्य असेल तर, १२% आणि १४% एवढा वार्षिक परतावा मिळाला तर दर महिना किती रुपयांचे एसआयपी करावे लागेल हे यापुढील तक्त्यात दिले आहे. (ज्या योजनेत गुंतवणूक केली असेल त्याप्रमाणे प्रत्यक्षातला परतावा मिळेल.)

| किती वर्षांनी रक्कम हवी | दर महिना गुंतवणूक (रूपये) | |
|---|---|---|
| (वार्षिक परतावा दर--- | (१२%) | (१४%) |
| १५ वर्षे | २०,००० | १६,५०० |
| २० वर्षे | १०,१०० | ७,७०० |
| २५ वर्षे | ५,२७० | ३,८०० |

१०% पेक्षा जास्त वार्षिक परताव्याची अपेक्षा असेल तर पालकांनी इक्विटी किंवा ॲग्रेसिव्ह हायब्रीड म्युच्युअल फंड योजनेत एसआय पी ने रक्कम गुंतवली तर इच्छित रक्कम उभी करता येईल. तसेच परदेशी शिक्षणाकरता जी रक्क्म लागेल ती जास्त असल्याने त्याकरता शैक्षणिक कर्ज घेता येईल. पण त्याची परतफेड करण्याची जबाबदारी मुलांवर टाकावी. मुलांना लहानपणापासूनच पालकांनी बचतीचं महत्त्व समजून द्यावं. त्यांचा पॉकेट मनी ते योग्य रीतीने खर्च करतात यावरही पालकांचे लक्ष असावे मुलांचे शिक्षण संपल्यावर त्यांनी कमाईला सुरुवात केली की लवकरात लवकर त्यांना म्युच्युअल फंड एस आय पी च्या माध्यमातून गुंतवणूक करण्याची सवय जरूर लावावी. 'आपल्या मुलांना आपण पुरेसा वेळ देऊ शकत नाही' अशी खंत नोकरी करणाऱ्या बऱ्याच पालकांना वाटत असते. आणि याची भरपाई मुलांच्या मनाप्रमाणे त्यांचे सर्व लाड करून करावी असाही काही जण प्रयत्न करत असतात जे त्यांनी टाळले पाहिजेत.

**भावनात्मक विचार नको**

मुलांच्यासाठी गुंतवणूक करताना भावनावश होऊ नये. कारण केवळ भावनांचा विचार केल्यास जास्त सुरक्षेचा विचार होतो व फक्त मुदतठेवीसदृश प्रकारांमधे गुंतवणूक होते, याची जोखीम कमी असली तरी परतावा कमी असतो. मुले पैसे मिळवत नसल्याने व यांच्यावर कोणी अवलंबून नसल्याने मुलांचा आयुर्विमा उतरवायची गरज नसते. पालकांनी टर्मप्लॅन करून पाल्यांचे भवितव्य सुरक्षित करावे. कारण जर वेळ आली तर अवलंबून असलेल्यांची आर्थिक तरतूद होऊ शकेल.

अनेकदा आजोबा/आजी किंवा अन्य वडिलधाऱ्यांकडून वाढदिवस किंवा सण-समारंभांच्या निमित्ताने मुलांना रक्कम मिळते. अशी रक्कम जेंव्हा जेंव्हा मिळेल तेंव्हा म्युच्युअल फंडात जरूर गुंतवावी. १८ वर्षाखालील अज्ञान पाल्याचे नावाने जर गुंतवणूक करायची असेल तर पाल्य+ पालक(आई/वडिल) यांचे एकत्रित बँक खाते असावे लागते. त्याकरता पालकाचे पॅन कार्ड आणि केवायसी असणे जरुरीचे असते पाल्याचे लागत नाही कारण पाल्याला सहीचा अधिकार नसतो. पाल्याने १८ वर्षे पूर्ण केल्यानंतर मग त्याचे/तिचे पॅन कार्ड काढून व स्वतंत्र बँकखाते उघडून ही गुंतवणूक त्याच्या/तिच्या एकट्या नावाने बद्लून घ्यायची असते.

कोणाच्या नावाने रक्कम गुंतवली याला फारसे महत्त्व नाही तर ती कशात आणि किती वर्षांकरता गुंतवली आहे हे महत्त्वाचे असते. पण अनेकदा आपलाच मुलगा मुदतीपूर्वीच रक्कम काढून घेईल आणि नातवंडाना मिळणार नाही अशी भीती वाटत असल्याने काही आजोबा/आजींना नातू/नातींच्या नावाने गुंतवणूक करायची इच्छा असते. अशा वेळी चिल्ड्रन ग्रोथ फंडातली ही रक्कम १८वर्षांपर्यंत लॉक करण्याचा आणि नंतर ही रक्कम नातू/नात

सज्ञान झाल्यावरच  त्यांच्या नावाने होईल हा पर्यायही खुला असतो.  म्युच्युअल फंडातील इतर योजनांना असा पर्याय नसतो.

## इक्विटी प्रकाराचे फायदे

सातत्याने सरासरी वार्षिक दोन अंकी (म्हणजे १०% पेक्षा अधिक) 'जोखीम सापेक्ष परतावा' देण्याची क्षमता फक्त इक्विटी या ॲसेट प्रकारामध्ये आहे. अर्थातच काही वर्षे उणे परतावा घेण्याचीही तयारी गुंतवणुकदारांची असली पाहिजे. मागील काळात तर एवढा परतावा मिळाला आहे जो भविष्यकाळातही मिळू शकेल याचे प्रमुख कारण म्हणजे आपल्या देशाची विकसनशील अर्थव्यवस्था. पुढील काळात आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास (रिअल जीडीपीतला वाढीचा दर) पुढील काळ वार्षिक ६%पेक्षा अधिक दराने होईल अशी अपेक्षा आहे. महागाईचा दर ६% अपेक्षित आहे. दीर्घ काळात शेअरच्या किंमतीसुद्धा विकासदराच्या प्रमाणात वाढतात असे दिसून आले आहे. त्यामुळे ६%+६% =१२% एवढ्या दराने शेअर्सवरती वार्षिक परतावा मिळेल अशी अपेक्षा ठेवता येईल. देशातील किंवा देशाबाहेरील अनेक घडामोडींचा बरा-वाईट परिणाम शेअरबाजारावर होत असतो. सध्या चालू असलेल्या रशिया-युक्रेन युद्धमुळेही महागाई वाढली आहे आणि जगभरातील शेअरबाजारात चिंतेचे वातावरण पसरले आहे. अशी परिस्थिती ही एक्ररकमी खरेदी करायलाही योग्य असते. अशा संकटातून संधी शोधून मुलांसाठीच्या आर्थिक तरतुदीसारखी दीर्घकालीन उद्दिटे साध्य करता येतील. मात्र आपल्या पोर्टफोलिओचा वर्षातून एकद/दोनदा तरी आढावा घेतला पाहिजे आणि गरज भासल्यास योजनेच्या कामगिरीप्रमाणे बदल केले पाहिजेत.

***